# प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, औरंगाबाद यांचे कार्यालय

वाचले : 1. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे गोपनिय पत्र क्र.बी(जन)–5601/57/2018/70, दिनांक 14–09–2018 व त्यानुसार लघुलेखक (निम्नश्रेणी) पदाची निवड/प्रतिक्षा यादी.
2. सल्लागार समितीचे इतिवृत्त दि. 26.9.2018 लघुलेखक (निम्न श्रेणी) पदाची निवड/प्रतिक्षा यादी 2018.
3. कार्यालयीन टिपणी दिनांक 26–11–2018

## कार्यालयीन आदेश

(क्र.बी–4/240/2018, दि. 26–11–2018)

मा. उच्च न्यायालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक (1) मध्ये निर्देशीत करण्यात आलेल्या अटी व शर्ती नमुद करुन जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद मार्फत दिनांक 21–09–2018 रोजी लघुलेखक (निम्न श्रेणी) पदाची निवड/प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. लघुलेखक (निम्न श्रेणी) पदाच्या निवड/प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांना नेमणूक देणेबाबत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, औरंगाबाद हे खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहेत. हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | | नविन नियुक्ती |
|---|---|---|---|
| 1 | श्रीमती कल्पना प्रदिप दुसाने, लघुलेखक (निम्न श्रेणी) प्रतिक्षा यादी (सन 2018) मधील अनुक्रमांक (40) वरील उमेदवार. | : | यांना लघुलेखक (निम्न श्रेणी) या पदावर तदर्थ स्वरूपात नियुक्ती देण्यात येत असून त्यांची नेमणूक दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर), सिल्लोड येथे लघुलेखक (निम्न श्रेणी) चे प्रतिक्षा यादी (सन 2018) मधील अनुक्रमांक (16) वरील उमेदवार श्री अमोल चंद्रशेखर दरेवार हे रुजू न झाल्यामुळे रिक्त असलेल्या लघुलेखक (निम्न श्रेणी) चे पदावर करण्यात येत आहे. |
| 2 | श्री श्रीरंग महेश भोसले, लघुलेखक (निम्न श्रेणी) प्रतिक्षा यादी (सन 2018) मधील अनुक्रमांक (41) वरील उमेदवार. | : | यांना लघुलेखक (निम्न श्रेणी) या पदावर तदर्थ स्वरूपात नियुक्ती देण्यात येत असून त्यांची नेमणूक दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर),कन्नड येथे लघुलेखक (निम्न श्रेणी) चे प्रतिक्षा यादी (सन 2018) मधील अनुक्रमांक (39) वरील उमेदवार श्री ज्ञानेश्वर युवराज ढगे हे रुजू न झाल्यामुळे रिक्त असलेल्या लघुलेखक (निम्न श्रेणी) चे पदावर करण्यात येत आहे. |

उपरोक्त संदर्भ क्र. 1 अन्वये लघुलेखक (निम्न श्रेणी) या पदासाठी भरतीच्या वेळी घेण्यात आलेल्या इंग्रजी व मराठी श्रुतलेखन (Dictation) तसेच इंग्रजी व मराठी टंकलेखन या चाचणी परीक्षांपैकी राखीव गटातील उमेदवारांना ज्या परीक्षेत 30 टक्के पेक्षा कमी गुण आणि खुल्या गटातील उमेदवारांना ज्या परिक्षेत 35 टक्के पेक्षा कमी गुण मिळालेले आहेत, ती प्रत्येक चाचणी परीक्षा त्या उमेदवारांनी त्यांचे नेमणूकीच्या दिनांकापासून एक वर्षाचे आत उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

त्याअनुषंगाने संदर्भ क्र.1 अन्वये उपरोक्त उमेदवारांची लघुलेखक (निम्नश्रेणी) पदावरील निवड वर नमूद करण्यात आलेल्या अटीस अधिन राहून तदर्थ स्वरुपात (Adhoc basis) करण्यात आलेली आहे. म्हणून त्यांनी त्यांचे नेमणूकीपूर्वी खालील आशयाचे बंध पत्र कार्यालयास लिहून देणे आवश्यक आहे.

<u>बंध – पत्र</u>

मी, ——————————————— बंधपत्र लिहून देतो की, माझी लघुलेखक (निम्न श्रेणी) या पदावरील नेमणूक तदर्थ (Adhoc basis) स्वरुपाची आहे. तसेच वर नमूद करण्यात आलेल्या चाचणी परीक्षांपैकी ज्या ज्या चाचणी परीक्षा उत्तीर्ण होणे मला बंधनकारक आहेत ती प्रत्येक परीक्षा मी माझे नेमणूकीच्या दिनांकापासून एक वर्षाचे आंत उत्तीर्ण न झाल्यास सदर सेवेतून मला मुक्त करण्यात येईल याची मला कल्पना आहे.

करीता हे बंध पत्र.

दिनांक :
ठिकाण :

स्वाक्षरी
उमेदवाराचे नाव व प्रतिक्षा यादीतील अ.क्र.

उपरोक्त लघुलेखक (निम्नश्रेणी) पदावर नेमणूक करण्यात आलेले उमेदवार यांना ज्या परिक्षेत कमी गुण मिळालेले आहेत त्याबाबतची माहिती ते सेवेत रुजू झाल्यानंतर स्वतंत्रपणे पत्राद्वारे कळविण्यात येईल.

उपरोक्त उमेदवारांची वेतननिश्चिती पीबी–2, वेतन बॅन्ड 9300–34800 व ग्रेड वेतन रूपये 4300/– या सुधारीत वेतन संरचनेत वेतन बॅन्ड रूपये 10100 + ग्रेड वेतन रूपये 4300/– = 14400/– या मुळ वेतनावर निश्चित करण्यात येत आहे.

उपरोक्त उमेदवारांनी कामावर रूजू झाल्यानंतर त्यांचे तात्पूरत्या स्वरूपाचे नेमणूकीचे बंध–पत्र, एकनिष्ठतेचे शपथपत्र, वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र आणि नियमानुसार आवश्यक ती सर्व कागदपत्रे त्वरीत नेमणूकीच्या ठिकाणी सादर करावीत. त्यांनी एक महिन्याची आगाऊ नोटीस दिल्याशिवाय राजीनामा दिला तर त्यांना एक महिन्याचे वेतन सरकार जमा करावे लागेल.

उपरोक्त उमेदवारांना शासन निर्णय वित्त विभाग कमांक अंनियो–1005/126/सेवा–4, दिनांक 31–10–2005 आणि शासन निर्णय कमांक अंनियो–1007/18/सेवा–4, दिनांक 07–07–2007 नुसार नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन लागू राहील.

उपरोक्त उमेदवारांनी हा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 30 दिवसांच्या आत त्यांचे नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे. अन्यथा त्यांचे नांव प्रतिक्षा यादीतून वगळण्यात येईल याबाबतची त्यांनी नोंद घ्यावी.

उपरोक्त उमेदवारांना प्रवास भत्ता आणि पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही.

जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद. )
)
दिनांक : 26 नोव्हेंबर, 2018. )

( प्रकाश हिं. माळी )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
औरंगाबाद.

...4

जा.क्र. आस्था/ १४५२१/2018.
दिनांक : 26 नोव्हेंबर, 2018.

याची एक प्रत माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव अग्रेषीत :

(01) दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), सिल्लोड/कन्नड.

(02) उप–कोषागार अधिकारी, सिल्लोड/कन्नड.

(03) सहाय्यक अधीक्षक, (वित्त व लेखा विभाग), जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद.

(04) श्रीमती कल्पना प्रदिप दुसाने, राहणार :– प्लॉट नं. 52, राधाकृष्ण नगर, मालतीदेवी तपोवन जवळ, जळगाव 425 001.
मार्फत : दिवाणी न्यायाधीश, (वरिष्ठ स्तर), जळगाव.

(05) श्री श्रीरंग महेश भोसले, राहणार :– एन 53, ए जे 1313 पाचवी योजना, महात्मा फुले नगर, पवन नगर, सिडको, उत्तमनगर, नाशिक 422 009.
मार्फत : दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), नाशिक.

याची एक प्रत संबंधित कर्मचा–यास यथोचित मार्गाने.

(06) श्री/श्रीमती ..................................................................

संबंधीत दिवाणी न्यायाधीश यांना विनंती करण्यात येते की, सदर आदेशाची प्रत आपले कार्यक्षेत्रातील उमेदवारांस बेलिफ मार्फत देण्यात येवून त्याबाबतची पोच पत्राव्दारे या कार्यालयास पाठविण्यात यावी.

जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद. )
)
दिनांक : 26 नोव्हेंबर, 2018. )

( प्रकाश हिं. माळी )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
औरंगाबाद.

* * * * *